जलसंपदा विभागाच्या अखत्यारितील, धरणक्षेत्रा-नजीकच्या अतिरिक्त जमिनी, विश्रामगृहे व रिक्त वसाहती Public Private Partnership (PPP) या तत्वावर खासगी यंत्रणांकडून विकसित करणे व व्यवस्थापन करणे यासाठीचे धोरण निश्चित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक:- बीओटी - २०१८/ प्र.क्र. ३१९/२०१८/सिं.व्य.(म).
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- १७ जून, २०१९

वाचा :- १) शासन आदेश क्र:- बीओटी - २०१८/ प्र.क्र. ३१९/२०१८/सिं.व्य.(म), दि. १४.०८.२०१८.
२) शासन परिपत्रक क्र.नौविप/२००३/१३५९/(१५/०३)/सिं.व्य(म) दि.८/१२/२००३.
३) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचा महाराष्ट्र पर्यटन धोरण २०१६ बाबतचा दि. ०४.०५.२०१६ चा शासन निर्णय क्र. टीडीएस २०१५/११/ प्र.क्र. १०२१/ पर्यटन.
४) शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचा दि. २६.०७.२०१८ चा शासन निर्णय क्र. न्यायाप्र २०१४/ प्र.क्र. १०५/ क्रीयुसे -१.

प्रस्तावना:-

राज्यात जलसंपदा विभागाअंतर्गत १३८ मोठे व २५५ मध्यम व २,८६२ लघुपाटबंधारे प्रकल्प पूर्ण झाले आहेत. यापैकी, अनेक धरणस्थळे सह्याद्री, सातपुडा इत्यादी डोंगर रांगांत व निसर्गरम्य ठिकाणी असून त्याठिकाणी पर्यटनस्थळे विकसित करण्यास मोठा वाव आहे. तसेच जलसंपदा विभागाअंतर्गत १४६ विश्रामगृहे महत्त्वाच्या ठिकाणी आहेत. जलसंपदा विभागांतर्गत असलेली धरणस्थळे व विश्रामगृहे बांधा - वापरा व हस्तांतरित करा (BOT) या तत्त्वानुसार विकसित केल्यास त्याद्वारे ग्रामिण भागात मोठ्या प्रमाणांत पर्यटन विकसित होईल. त्याचबरोबर प्रकल्पग्रस्तांना व स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतील. शिवाय, त्याद्वारे पाटबंधारे विकास महामंडळांना महसुलाचा स्त्रोत निर्माण होऊ शकतो. जलसंपदा विभागाच्या अखत्यारीतील धरणे व जलाशयांच्या जवळ पर्यटनक्षम विश्रामगृहे/ निरीक्षण बंगला/ निरीक्षण कुटी/वसाहती अस्तित्वात आहेत. सदर मालमत्ता दुरूस्ती व देखभालीअभावी मोठया प्रमाणात नादुरूस्त आहेत. तसेच विभागाकडील मनुष्यबळात मोठी घट झाल्यामुळे सदर मालमत्ता संरक्षित करण्यात मोठी अडचण होते.

जलसंपदा विभागाच्या अधिनस्त पर्यटनक्षम विश्रामगृहांचा/ निरीक्षण कुटी/ वसाहतीचा वापर वाढविण्याच्या दृष्टीने भांडवली गुंतवणूक करून परतावा मिळण्याच्या दृष्टीने सार्वजनिक खासगी भागिदारी (Public Private Partnership) P.P.P. या तत्त्वानुसार विकसित करून शासनाच्या महसूलात भर घालण्याबाबतचे धोरण स्विकारण्यात येत आहे. त्यादृष्टीने जलसंपदा विभागाच्या अखत्यारितील धरणस्थळे व विश्रामगृहे बांधा - वापरा व हस्तांतरित करा (BOT) (Built Operate and Transfer) अथवा सार्वजनिक खासगी भागिदारी (Public Private Partnership) P.P.P. या तत्त्वानुसार खासगी यंत्रणांकडून विकसित करणे, व्यवस्थापन करणे यासाठी जलसंपदा विभागाचे धोरण निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने वरील वाचा मधील क्र. १ नुसार याबाबत समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे.

जलसंपदा महामंडळाकडे असलेल्या मालमत्तांचा योग्य विनियोग करणे तसेच महामंडळाचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढविणे याचा विचार करुन महामंडळाच्या कायद्यातील कलम-१८ मध्ये महामंडळाची कामे / प्रयोजने नमूद करण्यात आलेले आहे.

सदर कलमातील उप कलम (आय) मध्ये खालील तरतूद आहे.

“पाटबंधारे आणि जलविद्युत प्रकल्पाच्या ठिकाणी व परिसरात पर्यटन, जलक्रिडा अन्य संबंधित उपक्रमांना चालना देणे.”

तसेच उप कलम (जे) मध्ये खालील तरतूद आहे.

"तलावासभोवतीच्या व तलावाजवळील आणि इतर योग्य ठिकाणी जमीन पाटबंधारे विषयक सुविधा व इतर पायाभूत सुविधांसह विकसित करणे आणि स्वारस्य असलेल्या व्यक्तीं/संस्थांना अशा विकसित मालमत्ता अंशत: किंवा पूर्णत: भाडेपट्टयाने देणे."

त्याचप्रमाणे महामंडळ कायदयाच्या कलम-१९ मधील उपकलम (फ) मध्ये जलाशय आणि त्याचा परिसर यांचा वापर करून जलक्रिडा, इतर मनोरंजनाचा उपक्रम यांच्या संबंधित हक्क भाडयाने देणे.
महामंडळांची प्रयोजने पार पाडण्यासाठीचा अधिकार कलम १९ (आय) मध्ये नमूद करण्यात आला आहे.

समितीचा प्राप्त अहवाल व महामंडळ अधिनियमातील तरतुदी इत्यादींचा विचार करुन मा. मंत्रिमंडळ समितीच्या दिनांक ११ जून, २०१९ रोजीच्या बैठकीतील मान्यतेने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

१.० धोरण:-

जलसंपदा विभागाच्या अखत्यारितील ५ महामंडळांच्या अधिनियमातील या संदर्भातील तरतुदी सारख्याच असल्याने व राज्यात सुसुत्रता व एकसमानता रहावी याकरिता राज्यस्तरावरचे एकत्रित धोरण तयार करण्याचे प्रस्तावित होते.

जलसंपदा विभागाच्या अखत्यारितील विविध महामंडळांकडे असणाऱ्या पर्यटनक्षम जमिनी, स्थळे, विश्रामगृहे, इमारती, वसाहती सार्वजनिक खासगी भागीदारी (Public Private Partnership) P.P.P. वा हेतूपरत्वे बांधा - वापरा व हस्तांतरित करा (BOT) या तत्वावर विकसित करण्याचे धोरण स्विकारण्यात येत आहे.

सदर धोरणाचे उद्दीष्ट खालीलप्रमाणे आहे.

१) जलसंपदा विभागाच्या अखत्यारितील पर्यटनक्षम स्थळांचा विकास करणे.
२) खाजगी विकासकांना गुंतवणुकीसाठी प्रोत्साहन देणे.
३) सदर धोरण राबविण्यासाठी नियमावली तयार करणे.
४) सदर धोरण महाराष्ट्र पर्यटन धोरण २०१६ शी सुसंगत असेल.
५) नौकानयन, जलक्रिडा व मनोरंजन पार्क विकसित करणे.
६) कला व हस्ताकला केंद्र उभारणी करणे.
७) कॅम्पिंग, कॅरावानिंग व तंबूची सोय करणे.
८) रोप वे ची सुविधा पुरविणे.
९) परिषद व प्रदर्शन केंद्र विकसित करणे.
१०) हिल स्टेशन म्हणून विकसित करणे.
११) पर्यटनाच्या दृष्टीने विविध उपक्रम राबविणे.
१२) पर्यटन स्थळे व विश्रामगृहे विकसित करणे.
१३) धरण व जलाशय परिसरातील अतिरिक्त शासकीय जमिनी पर्यावरण पूरक तसेच पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करणे.

२. धोरणाबाबतीत कार्यपध्दती व नियम :-

अ) व्याप्ती :-

जलसंपदा विभागाची पर्यटनक्षम विश्रामगृहे/ निरीक्षण कुटी/ वसाहती/ धरणस्थळे धोरण राबविण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहेत.

यांव्यतिरिक्त पाटबंधारे विकास महामंडळाच्या कायद्यात नमूद केल्याप्रमाणे विविध जलक्रिडा, मनोरंजनविषयक बाबी, पर्यटनविषयक पायाभूत सुविधा, नौकानयन, महाराष्ट्र पर्यटन धोरण २०१६ मध्ये नमूद केलेल्या परंतु महामंडळ कायदयानुरूप बाबी इ. साठीही हे धोरण लागू असेल. तसेच सदर पर्यटन स्थळांवर साहसी प्रकारातील क्रिडा प्रकार उदा. जलक्रिडा इत्यादींबाबत शालेय शिक्षण व क्रिडा विभागाने शासन निर्णय क्र.न्यायाप्र-२०१४/प्र.क्र.१०५/क्रीयुसे-१ दि.२६/०७/२०१८ अन्वये निर्धारित केलेली मार्गदर्शक तत्वे काही अटींसह लागू राहतील.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने निवडक स्थळे त्यांचेमार्फत विकसित करावयाचे प्रस्तावित केल्यास त्याबाबत संबंधित पाटबंधारे विकास महामंडळांच्या सहमतीने निर्णय घेण्यात येईल. तसेच संबंधित पाटबंधारे विकास महामंडळाने विकसित करावयाच्या स्थळांची निवड महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या सहमतीने करण्यात येईल.

ब) पर्यटस्थळाचा प्रकार व कराराचा कालावधी:-

कंत्राटाचा मूळ कालावधी वाढविण्यास सक्त मनाई करण्यात यावी, ही बाब करारपत्रामध्ये अंतर्भूत करण्यात यावी.

सदर धोरण राबविताना कालावधी निश्चित करताना पर्यटनक्षम स्थळांची तीन प्रकारात विभागणी करण्यात येईल.

"अ" प्रकारातील पर्यटनक्षम स्थळे :- या प्रकारामध्ये जलसंपदा खात्याकडे उपलब्ध असलेल्या मालमत्तेची दुरूस्ती करून वापरात आणणे. या प्रकारामध्ये जलसंपदा विभागाची उपलब्ध असलेली पर्यटनक्षम स्थळावरील मालमत्ता वापरासाठी हस्तांतरित केली जाईल व मालमत्ता विकासकाकडून वापरात आणली जाईल. या प्रकारात कराराचा कालावधी कमाल १० वर्षे राहिल. हा कालावधी संपल्यानंतर कंत्राटदारास कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ न देता ही जागा तातडीने जलसंपदा विभागाने आहे त्या स्थितीमध्ये त्यावरील इमारतींसह ताब्यात घेऊन या कामाच्या पुन्हा ई-निविदा पद्धतीने जाहिर निविदा (EOI) मागविण्यात येतील.

"ब" प्रकारातील पर्यटनक्षम स्थळे :- या प्रकारामध्ये जलसंपदा विभागातर्फे मालमत्ता उपलब्ध करून दिली जाईल व सदर मालमत्तेच्या विकासासह इतर सर्व बांधकाम व सुविधांसाठी गुंतवणूक विकासकाने करावयाची आहे. या प्रकारामध्ये जलसंपदा विभागाची पर्यटनक्षम स्थळावरील मालमत्ता वापरासाठी हस्तांतरित केली जाईल. विकासकाकडून सदर मालमत्ता व उपलब्ध जमिनीवर नवीन बांधकामे करून वापरात आणता येईल. या प्रकारात कराराचा कालावधी कमाल ३० वर्षे इतका राहील. हा कालावधी संपल्यानंतर कंत्राटदारास कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ न देता ही जागा तातडीने जलसंपदा विभागाने आहे त्या स्थितीमध्ये ताब्यात घेऊन या कामाच्या पुन्हा ई-निविदा पद्धतीने जाहिर निविदा (EOI) मागविण्यात येतील.

"क" प्रकारातील पर्यटनक्षम स्थळे :- या प्रकारामध्ये जलसंपदा विभागातर्फे फक्त जमिन भाडेतत्वावर उपलब्ध करून दिली जाईल. इतर सर्व खर्च व गुंतवणूक विकासकाने करावयाची आहे. या प्रकाराच्या कराराचा कालावधी कमाल ३० वर्षे इतका राहील. हा कालावधी संपल्यानंतर कंत्राटदारास कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ न देता ही जागा तातडीने जलसंपदा विभागाने आहे त्या स्थितीमध्ये ताब्यात घेऊन या कामाच्या पुन्हा ई-निविदा पद्धतीने जाहिर निविदा (EOI) मागविण्यात येतील.

क) विकासकाची निवड करण्याची कार्यपध्दती :-

१) जलसंपदा विभागातील पर्यटनक्षम स्थळांची यादी संकेत स्थळावर उपलब्ध असेल. सदर यादी वेळोवेळी अद्ययावत करण्यात येईल. सदर यादीतील पर्यटनस्थळे प्राधान्यक्रमानुसार विकसित करण्याबाबत ई-निविदा पध्दतीने जाहिर निविदा (EOI) मागविण्यात येतील.

२) विकासकाची पूर्व अर्हता तपासण्यात येईल. पूर्व अर्हतेसाठी तांत्रिक व आर्थिक अटी शर्ती, पुर्वानुभव इत्यादी बाबी तपासण्यात येतील. पूर्व अर्हतेच्या विविध अटी, शर्तींना गुणांक दिले जातील. विकासकाने पूर्व अर्हतेमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे त्याची पात्रता ठरविण्यात येईल.

३) पूर्व अर्हतेमध्ये पात्र असलेल्या विकसकास मुख्य निविदा संच देण्यात येतील. सदर निविदेमध्ये विकासकाने शासनास द्यावयाची किमान किंमत नमूद करण्यात येईल. विकासकाने पर्यटनस्थळाचे निरीक्षण करून त्यास आवश्यक त्या बाबी तपासून सदर किंमतीच्या वर बोली लावणे अपेक्षित आहे. तसेच वर्षनिहाय शासनास दयावयाची रक्कम विकासकाने नमूद करावी. या सर्व बोलींची तपासणी करून आजची किंमत (Net present value) काढण्यात यावी. ज्या विकासकाने आजच्या किंमतीस जादा बोली केली असेल त्यास निवडण्यात येईल.

४) विकासकाने भरावयाची बयाणा रक्कम व इतर बाबी Standard Bid document मध्ये नमूद करण्यात येतील.

५) या कामांसाठीचे Standard Bid Document शासन स्तरावर महसूल व वन विभाग, विधी व न्याय विभाग, नियोजन विभाग, वित्त विभाग व पर्यटन विभाग यांच्या सहमतीने स्वतंत्रपणे मंजूर करण्यात येईल.

ड) निविदा प्रसिध्दी:- या कामांच्या संबधित महामंडळामार्फत ई-निविदा पध्दतीने निविदा मागविण्यात याव्यात. तसेच निविदा सूचनेस संकेतस्थळावर तसेच माहिती व जनसंपर्क संचालनालयामार्फत वर्तमानपत्रात यथायोग्य प्रसिध्दी देण्यात यावी.

पूर्व अर्हता निविदा (RFQ)/ निविदा (RFP) छाननी समिती :-

पूर्व अर्हता निविदा (RFQ)/ निविदा (RFP) यांची छाननी करण्याकरीता क्षेत्रीय स्तरावर समिती स्थापन करण्यात यावी. सदर समितीची रचना खालीलप्रमाणे असावी.

१)	मुख्य अभियंता	अध्यक्ष
२)	संबंधीत अधीक्षक अभियंता	सदस्य
३)	अधीक्षक अभियंता (इतर मंडळ)	सदस्य
४)	विभागीय लेखापाल	सदस्य
५)	P.P.P . तज्ञ/आर्थिक सल्लागार/सनदी लेखापाल (C.A.)	सदस्य
६)	विधी तज्ञ/ विधी सल्लागार.	सदस्य
७)	संबंधीत कार्यकारी अभियंता	सदस्य सचिव

ई) निविदा मान्यतेचे अधिकार :-

निविदा छाननी समितीने मान्य केलेली निविदा मंजूर करावयाचे अधिकार संबंधित महामंडळाच्या नियामक मंडळास असतील.

फ) नौकानयन :-

जलसंपदा विभागाचे मोठया, मध्यम व लघु प्रकल्पांच्या जलाशयात नौकाविहारास परवानगी देण्याची कार्यपध्दती व दर हे शासन परिपत्रक क्र.नौविप-२००३/१३५९/ (१५/०३)/ सिं.व्य(म) दि.८/१२/२००३ मध्ये विहित केलेले आहेत. परंतु सदर परिपत्रकात प्रवर्तकास नौका विहारास परवानगी देताना शासनाने निर्धारीत केलेल्या दरानुसार कार्यवाही करण्यात येते.

प्रस्तावित धोरणात नौका विहारासाठी शासनामार्फत दर न ठरविता प्रवर्तकाकडून उच्चत्तम दर मागवून त्यानुसार परवानगी देण्यात यावी. तसेच यामध्ये स्पर्धात्मक वातावरण ठेऊन एकाच

जलाशयात एकापेक्षा जास्त प्रवर्तकास परवानगी देता येईल, याबाबत मुख्य अभियंता स्तरावर निर्णय घ्यावा. दि. ८/१२/२००३ मधील उर्वरीत सर्व अटी व शर्ती कायम राहतील.

ग) संकीर्ण :-

१) सर्व विश्रामगृहांचे आरक्षण ऑनलाईन पद्धतीने करण्यात यावे.

२) राष्ट्रीय आपत्तीच्या कालावधीत विश्रामगृहातील आरक्षण २४ तासांची पूर्व सूचना देऊन रद्द करण्याचे अधिकार संबंधित अधीक्षक अभियंता यांना राहतील.

३) सदर धोरणास धरण सुरक्षितता विषयक शासन निर्णय, महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम-१९७६, महाराष्ट्र जलक्षेत्र नियमन प्राधिकरण अधिनियम-२००५, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडील नियम, हॉटेल्सबाबतचे नियम, संरक्षण कायद्याचे नियम इ. अनुषंगिक तरतुदी लागू राहतील.

४) पर्यटकांकडून धरणाच्या सुरक्षिततेस बाधा पोहोचणार नाही, तसेच त्या परिसरातील सजीवसृष्टी (Ecology) तसेच वनस्पती व प्राणी (Flora & Fauna), वन्य जिवांना इजा/ उपद्रव होणार नाही, संरक्षण होईल याची काळजी घेण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विकासकाची राहिल.

५) शासन सदर प्रकल्पांवर जी ठिकाणे / क्षेत्र निषिध्द क्षेत्र म्हणून विहित करेल ती ठिकाणे पर्यटकांसाठी वर्ज्य राहतील व अशा ठिकाणी पर्यटक जाणार नाही, याठिकाणी नौकानयन व जलक्रिडा होणार नाहीत याचे संनियंत्रण करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहिल. ह्याच संबंधात धरणापासून काही अंतरापर्यंत (हे अंतर कमीत कमी ३०० मीटर राहिल) तलावात तसेच धरणाच्या खालील बाजूने काही अंतरापर्यंत व सभोवतालची व आवश्यक त्या इतर ठिकाणाचे काही क्षेत्र वरीलप्रमाणे पर्यटक-निषिध्द म्हणून ठरविण्यात येईल.

६) राष्ट्रीय सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून पोलीस खात्याचा अनुभव व अभिप्राय विचारात घेऊन त्यांचेकडून “ना हरकत प्रमाणपत्र” कंत्राटदारास उपलब्ध करून घ्यावे लागेल.

७) पर्यटकांच्या सुरक्षितेबद्दल कंत्राटदार आवश्यक ती उपाययोजना करील व त्यासंबंधात ते पूर्णत: जबाबदार राहतील. तसेच जलाशयातून कालव्यांत सोडल्या जाणाऱ्या प्रवाहात किंवा सांडव्यावरून जाणाऱ्या जलाशयातील पाण्याच्या प्रवाहात पर्यटक येणार नाहीत, याकरिता त्यांना योग्य त्या पूर्व सूचना देणे व त्यादृष्टीने उपाययोजना करणे आवश्यक राहिल. जलाशयातील पाणी पातळी पूर्ण जलाशय पातळीच्या वर गेली असल्यास / धरण सांडव्यातून पाणी सोडण्याच्या कालावधीत जलाशयात जलक्रिडा करण्यास मज्जाव राहिल. पर्यटक त्यात सापडल्यामुळे त्यांना इजा झाल्यास त्याची सर्व जबाबदारी कंत्राटदाराची राहिल.

८) पर्यटकांमुळे धरणाच्या किंवा प्रकल्पाच्या कामास सुरक्षिततेस बाधा/ नुकसान झाल्यास त्यासंबंधीच्या दुरूस्तीचा खर्च देणे कंत्राटदारास बंधनकारक राहिल.

९) पर्यटकांच्या सुरक्षिततेसंबंधी कायदेशीर प्रश्न व इतर बाधा निर्माण झाली व त्यांना काही भरपाई दाखल रक्कम देणे आवश्यक झाले तर त्या संबंधातील सर्व जबाबदारी कंत्राटदाराची राहील व त्या संबंधातील सर्व खर्च कंत्राटदार देईल.

१०) धरणातील पाण्याची पातळी पाणी वापराप्रमाणे सतत वर खाली होईल. तसेच धरणातील लाटांची परिस्थिती सुध्दा त्या परिसरातील वाऱ्यांची गती व दिशेप्रमाणे व हंगामाप्रमाणे राहिल. पाण्याच्या पातळीच्या स्थितीत वरील प्रकारे नैसर्गिक कारणांमुळे किंवा जलाशयातील पाणी वापरांमुळे होणाऱ्या सततच्या बदलामुळे कंत्राटदारास व पर्यटकांना कोणत्याही प्रकारची हानी (शारिरीक, आर्थिक इ.) झाल्यास त्याबाबत कोणत्याही प्रकारे शासनावर /पाटबंधारे महामंडळांवर जबाबदारी राहणार नाही.

११) जलाशयाची / धरणाची दुरूस्ती अथवा इतर कामे करतांना अशा कामांना पर्यटकांना अडथळा होणार नाही, याची काळजी कंत्राटदार घेईल.

१२) जलाशयांचा वापर पिण्याच्या पाण्याकरीताही केला जात असल्याने त्या ठिकाणी विशेष स्वच्छता राखली जाईल, याची खबरदारी कंत्राटदार घेईल.

१३) प्रकल्पाच्या पाणी वापराच्या किंवा धरण सुरक्षितेच्या संदर्भात बाधा निर्माण होते, असे आढळून आले किंवा पाणी दूषित होत असल्याचे दिसून आले तर ही जलक्रिडेबाबतची परवानगी शासन केव्हाही काढून घेईल. यामुळे कंत्राटदारास जर काही आर्थिक नुकसान झाले तर त्यास शासन जबाबदार राहणार नाही.

१४) करारनामा झाल्यानंतर आणखी काही अटी विहित करणे शासनास आवश्यक वाटल्यास त्यांचा ही त्या करारातच पूरक अटी म्हणून नंतर अंतर्भाव करता येईल व त्या अटीदेखील कंत्राटदारास बंधनकारक राहतील.

१५) या करारनाम्याअंतर्गत कुठलाही वाद निर्माण झाल्यास संबंधीत अधीक्षक अभियंता/ अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

१६) पाटबंधारे खात्याचे संबंधित अधिकारी व कर्मचारी जलक्रिडा व जलक्रिडेशी संलग्न पर्यटन संकुलास भेट देऊन वेळोवेळी तपासणी करतील व त्यांना पूर्ण सहकार्य देण्याचे कंत्राटदारास बंधनकारक राहिल.

१७) धरणस्थळे/ विश्रामगृहे या परिसरामध्ये कोणत्याही मादक द्रव्याची विक्री/ सेवन करता येणार नाही. तसे आढळल्यास कंत्राटदारासोबतचा करारनामा तात्काळ रद्द करण्यात येईल.

१८) यासंबंधात केंद्र व राज्य शासनाचे त्या त्या वेळचे प्रचलित नियम कंत्राटदारावर बंधनकारक राहतील.

१९) शासकिय अधिकाऱ्यांसाठी (सेवानिवृत्त व कार्यरत) या मालमत्तेच्या वापरासाठी हक्क राहिल व त्याप्रमाणे करारनाम्यात आवश्यक ती सवलत / ठराविक प्रमाणात आरक्षणाची तरतूद करण्यात यावी.

२०) ज्या विकासकास कंत्राटदारास ठेका मिळाला त्याने ते काम कोणात्याही उप विकासकास उप कंत्राटदारास (Sublet) पोटभाडयाने देता येणार नाही.

२१) जलसंपदा विभागाच्या यादीत नसलेली परंतु विकासकाकडून प्रस्तावित करण्यात आलेली स्थळे :- विकासकाकडून प्रस्तावित करण्यात आलेल्या येऊन त्याबाबतच्या शक्याशक्यतेचा अभ्यास करुन (Feasibility Study) केल्यावर पर्यटन स्थळ विकसित करण्यासाठी ई-निविदा पद्धतीने जाहिर निविदा मागऊन निविदा निश्तिची करावी.

२२) जलसंपदा विभागाचा दि. १७/११/२०१६ चा शासन निर्णय क्रमांक देवदु -२०१५/ (८३६/२०१५)/ सिं.व्य. (कामे) नुसार या माध्यमातून मिळणारा महसूल संबंधित महामंडळाकडे जमा होईल व तो पाटबंधारे प्रकल्पांच्या परिरक्षण व दुरुस्तीकरिता वापरता येईल.

२३) जलसंपदा विभागाच्या मालमत्तेचा P.P.P (Public Private Partnership) तत्वावर विकास करताना शक्यतो, जलसंपदा विभागाने त्यांची मालमत्ता भाडेपट्ट्याने देऊ नये. तसेच, अशा मालमत्तेचा विकास करताना, मालकी हक्काचे हस्तांतरण न करता फक्त Concession Agreement चा भाग म्हणून विहीत कालावधीसाठी मालमत्तेचा ताबा Concessionaire ला देण्यात यावा.

२४) या प्रस्तावांतर्गत दिलेल्या जमिनी महसूल विभागाचे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ व त्याखाली विविध नियम व विनियमांचे पालन होणे आवश्यक आहे. महसूल विभाग जी भाडेपट्टीचा कालावधी (Concession Agreement period) व न्यूनत्तम दरप्रणाली अशा प्रकारच्या भाडेपट्टा हस्तांतरणाकरिता लागू करेल त्यापेक्षा कमी दराने जमिनीचे हस्तांतरण होणार नाही, याची काळजी महामंडळ दक्षता घेईल.

२५) पर्यटन विभागामार्फत महाराष्ट्र पर्यटन धोरण, २०१६ अंमलात आले असून यामधील विविध तरतुदी जलसंपदा विभागाद्वारे विकसित होणारे धरणस्थळ व विश्रामगृह या पर्यटन स्थळांना लागू राहतील. पर्यटन विकास महामंडळाने निवडक स्थळे त्यांच्यामार्फत विकसित करावयाचे प्रस्तावित केल्यास त्याबाबत संबंधित पाटबंधारे विकास महामंडळाच्या समन्वयाने व सहमतीने निर्णय घेण्यात यावा. तसेच पाटबंधारे विकास महामंडळाने विकसित करावयाची स्थळे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या सहमतीने निवड व विकसित करण्यात येतील.

२६) जलसंपदा विभागाचा कराराचा कालावधी व पर्यटनक्षम स्थळाच्या अ, ब, व क प्रकाराव्दारे जलसंपदा विभागाची मालमत्ता हस्तांतरीत करतांना सदर जमिनीवरील हक्क कोणत्याही परिस्थितीत कायमस्वरुपी प्रस्थापित होणार नाहीत, याची दक्षता घेणे आवश्यक आहे. त्यासाठी सदर बाबीचा निविदातील अटी व शर्तीमध्ये तसा उल्लेख करावा. तसेच निविदांमधील अटी व शर्तीचा भंग झाला आहे किंवा कसे, याचे विशिष्ट कालावधीनंतर परिक्षण करण्याची करारामध्ये तरतूद नमूद करणेत यावी.

२७) निविदा धारकास/ विकासकास काम कोणत्याही परिस्थितीत Sublet किंवा Sublease करता येणार नाही.

२८) निविदा धारकास / विकासकास समभाग विकून नवीन भागिदार समाविष्ट करण्यास परवानगी नसेल.

२९) निविदेतील समाविष्ट शासकीय मालमत्ता (जमीन, इमारत इ.) गहाण / तारण ठेवण्यास अथवा कर्ज उभे करण्यासाठी वित्तीय संस्था व इतर कोणासही शासनामार्फत ना - हरकत प्रमाणपत्र देण्यात येणार नाही. तसेच शासकीय मालमत्ता गहाण / तारण ठेवता येणार नाही.

सदरचा शासन निर्णय गृह विभाग, महसूल व वन विभाग, पर्यटन व सांस्कृतिक विभाग, विधी व न्याय विभाग, नियोजन विभाग यांच्या सहमतीने तसेच वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक ३५/ २०१९ दिनांक २५/१/२०१९ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्यांचा संगणक संकेतांक २०१९०६१८११४६४२६८२७ असा असून डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Atul Ashok Kapole

Digitally signed by Atul Ashok Kapole
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=797fcfe0bb4a86dd814129f50d05c1d249ea6f0acc364c6214f11ff7174bd5ef, serialNumber=ae2c4f4c985d3e984de94324901263d48766ec651dea49d652faf11a96aa98b5, cn=Atul Ashok Kapole
Date: 2019.06.18 11:47:53 +05'30'

(अ.अ.कपोले)
उप सचिव (सिं.व्य.), महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) मा. राज्यपाल यांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री महोदयांचे स्विय सहायक, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई
३) मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई
४) मा.सभापती/उपसभापती, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई,
५) मा.मंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई,
६) मा.राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई,
७) मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा,मुंबई यांचे कार्यालय,विधानभवन, मुंबई,
८) मा.विरोधी पक्षनेते, विधानपरिषद ,मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई
९) अपर मुख्य सचिव,गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
११) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२) अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३) प्रधानसचिव (जलसंपदा) ,जलसंपदा विभाग,मंत्रालय, मुंबई,
१४) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५) प्रधान सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई,

१६) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई,
१७) सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१८) सर्व कार्यकारी संचालक, पाटबंधारे विकास महामंडळ,
१९) सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग,
२०) सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा मंडळ,
२१) सर्व उपसचिव /सहसचिव, जलसंपदा विभाग,मंत्रालय, मुंबई,
२२) महासंचालक,महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक,
२३) सिं.व्य.(महसूल) कार्यासन संग्रहार्थ.